RNI No. MAHBIL /2009/37831

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक ५१(२)] गुरुवार, एप्रिल २१, २०१६/वैशाख १, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १२४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ एप्रिल २०१६.

अधिसूचना

भूमिसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक एलक्यूएन-१२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२(भाग-१६).—भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम १०९ ची पोट-कलमे (१) व (२) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व उक्त अधिनियमाच्या कलम ११२ अन्वये पूर्वप्रसिद्धी देण्यात आल्यानुसार महाराष्ट्र शासन भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०१४ मधील सुधारणा खालीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे जसे की,—

१. या नियमांना, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मूळ नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम ७ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"७. विविध शाखेतील तज्ज्ञ गट :—(१) समुचित शासन, अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे विविध शाखेतील तज्ज्ञ गट गठित करील. हा तज्ज्ञ गट पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल :—

(क) दोन अशासकीय समाजशास्त्रज्ञ ;

(ख) यथास्थिति पंचायती, ग्रामसभा, नगरपालिका किंवा महानगरपालिका यांचे दोन प्रतिनिधी ;

(ग) पुनर्वसन क्षेत्रातील दोन तज्ज्ञ ; आणि

(घ) प्रकल्पाशी संबंधित असणाऱ्या विषयातील तंत्रविषयक तज्ज्ञ.

(२) समुचित शासन, तज्ज्ञ गटाच्या सदस्यांमधून एका व्यक्तीला गटाचा अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करील."

३. मुख्य नियमांच्या नियम ८ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, " राज्य शासनाच्या " या मजकुराऐवजी " समुचित शासनाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) पोट-कलम (२) मधील, ज्या दोन्ही ठिकाणी " राज्य शासन " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे त्या दोन्हीही ठिकाणी " समुचित शासन " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. कि. गावडे,

शासनाचे उप सचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 21st April 2016.

NOTIFICATION

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. LQN-12/2013/C.R.190/A-2(Part-16).—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (Amendment) Rules, 2014, the same having been previously published as required by section 112 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (Amendment) Rules, 2016.

2. For rule 7 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014 (hereinafter referred to as "the principal Rules"), the following shall be substituted, namely :—

" 7. *Multi-disciplinary Expert Group.—(1)* The Appropriate Government shall constitute a multi-disciplinary Expert Group as provided under sub-section *(1)* of section 7 of the Act. The Expert Group shall consists of,—

(a) two non official social scientists ;

(b) two representatives of *Panchayats, Gram Sabha, Municipality or Municipal Corporation,* as the case may be ;

(c) two experts on rehabilitation ;

(d) a technical expert in the subject relating to the project.

(2) The Appropriate Government shall nominate a person from amongst the members of the Expert Group as the Chairperson of the Group.".

3. In rule 8 of the principal Rules,—

(a) in sub-rule *(1),* for the words "State Government" the words "Appropriate Government" shall be substituted ;

(b) in sub-rule *(2),* for the words "State Government" the words "Appropriate Government" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Deputy Secretary to Government.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ एप्रिल २०१६

अधिसूचना

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक एलक्युएन-१२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२(भाग-१६).—भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम १०९ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजिलेल्या भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१४ या नियमांचा पुढील मसुदा हा, बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ११२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासनाकडून * दिनांक २० मे २०१६ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उपरोक्त दिनांकापूर्वी, उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, सचिव (वने), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ आणि उप सचिव (पुनर्वसन व पुनर्स्थापना), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

नियमांचा मसुदा

१. या नियमांना भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (तृतीय सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ याच्या नियम १४ मध्ये, उप-नियम (१) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १६६६ (१९६६ चा ३७) याच्या तरतुदी अन्वये विकास योजेनेतील आरक्षित जागांच्या संपादनाबाबत, त्याचप्रमाणे ५० टक्के किंवा त्याहून अधिक अपूर्ण सिंचन प्रकल्पांसाठीच्या संपादनाबाबत भूमि संपादनाच्या मूल्याच्या ३० टक्के रक्कम उक्त अधिनियमाच्या कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध होण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात व्याजाशिवाय जमा करण्यात यावी व भूमि संपादनाच्या मूल्याची उर्वरित ७० टक्के रक्कम निवाडा प्रसिद्ध होण्यापूर्वी जमा करण्यात यावी आणि जर अशी रक्कम जमा करण्यात आली नसेल तर उक्त अधिनियमाच्या कलम १९ व २३ अन्वये अनुक्रमे घोषणा करण्यात किंवा निवाडा देण्यात येऊ नये."

सदर परंतुक नवीन पाटबंधारे प्रकल्पांसाठी लागू होणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. कि. गावडे,
शासनाचे उप सचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 21st April 2016.

NOTIFICATION

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. LQN-12/2013/C.R.190/A-2(Part-16).—The following draft of rules further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of section 109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published, as required by section 112 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 20 day of May, 2016.

2. Any objections or suggestions which may be received by the Secretary (Forests), Revenue and Forests Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft before the aforesaid date will be considered by the Government.

DRAFT RULES

1. These rules may be called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (Third Amendment) Rules, 2014.

2. In rule 14 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, to sub-rule (*1*), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, in cases of acquisition of the reserved places in development plan under the provisions of The Maharashtra Regional Town Planning Act, 1966 (37 of 1966) as well as in cases of acquisition for 50 % or more incomplete irrigation projects, 30% of amount of cost of acquisition of land shall be deposited, without interest, in the Collector Office before the publication of the declaration under section 19 of the Act and the remaining 70% amount of cost of acquisition of land shall be deposited before the publication of the award and no declaration or award shall be made under section 19 or 23 of the act, respectively, if such amount is not deposited. "

However, said proviso will not be applicable to the new irrigation projects.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.